
Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# बोली आणि भाषा

**डॉ. प्रतीक्षा गायकवाड**
**मराठी विभागप्रमुख, पेमराज सारडा महाविदयालय,अहमदनगर**

दैनंदिन जीवनात एकमेकांशी व्यवहार करण्यासाठी किंवा एकमेकांशी संवाद साधण्यासाठी किंवा एकमेकांना आपले मत समजावून सांगण्यासाठी आपण ज्या भाषेचा आधार घेतो, त्या भाषेला व्यवहार भाषा किंवा बोलभाषा किंवा बोलीभाषा असे म्हणतात. अर्थातच मानवी जीवनात बोलभाषेला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण या बोली भाषेमुळेच मनुष्य साक्षर असो वा निरक्षर असो तो त्याचे विचार थेट दुस—यापयत पोहचवू शकतो. मानवी जीवनात जिवंत, रसरशीत अशा बोली भाषेला जसे महत्वाचे स्थान आहे. तसेच प्रमाण भाषेला सुध्दा महत्त्वाचे स्थान आहे. कारण शासनमान्य नियमानुसार आपण बोलण्याकरिता / प्रादेशिक स्तरानुसार बोलीचे स्वरुप बदलते, हे आपल्या मान्य करावे लागते, दर बारा कोसावर भाषा बदलते, असे म्हणतात. दोन समाजगटाची बोली भाषा ही एकसंध नसते, तशीच दोन व्यक्तिंचीही बोली ही एकसारखी नसते. प्रमाण भाषेकडे पाहावे लागते. भाषेचा विचार पुढील मुद्यांना अनुसरुन करता येणे शक्य आहे.



आपल्याला दोन पातळयांवर भाषचा विचार करता येतो. 1) प्रमाण भाषा 2) बोली, प्रमाण भाषेचा पुन्हा दोन अंगानी विचार करता येतो. ते म्हणजे– लेखन आणि बोलणं. प्रमाण भाषेतून जास्त प्रमाणात लेखन झाल्यामुळे / होत असल्यामुळे ती भाषा स्थिरावते. त्यातून ती राजकीय, वैचारिक क्षेत्रात मान्यता पावली, तर विकसनशील होते. प्रमाण भाषेतून बोलण्याचे प्रमाण हे कमी जास्त असू शकते. उदा. मुंबई – पुण्याला प्रमाण बोलीचाच वापर केलेला दिसून येतो. तर बोलीभाषेतून लेखन कमी प्रमाणात होत किंवा होत ही नाही, असे ही म्हटले जाते. परंतु आधुनिक कालखंडातील ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य याला अपवाद आहेत. कारण त्यांच्याच बोलीतून त्यांचे साहित्य आकाराला आलेले दिसून येते.

बोली हा शब्द मराठीत Dialect या इंग्रजी शब्दाचा पर्याय म्हणून वापरला जातो. याशिवाय प्रांतिक भेद, प्रादेशिक भेद, दैशिक भाषाभेद, पाटभाषा, असेही पयार्यी शब्द वापरले जातात. तर हिंदी मध्ये बोली, विभाषा, उपभाषा, प्रांतीय भाषा अशा पर्यायी शब्दाचा वापर केला जातो. डॉ. श्यामसुंदरदास यांनी 'Sub-dialect' वा 'Patois' करिता 'बोली' हा शब्द वापरला आहे. पण त्या अर्थाने रुढ होऊ शकला नाही. आज मराठी प्रमाणेच हिंदी भाषेतही बोली हा शब्द 'Dialect' या अर्थाने प्रचलित झालेला आहे.

भाषा आणि बोली किंवा 'Language' आणि 'Dialect' या कल्पनांमध्ये विशेष भेददर्शक असे काही नाही. तथापी व्यवहाराच्या सोयीसाठी आपण प्रमाण बोलीला व ग्रांथिक भाषेला 'Language' असे संबोधतो आणि वर्गीय किंवा स्थानिक भाषाभेंदाना 'Dialect' असे म्हणतो. प्रत्येक माणूस आपल्या घरात व आसपासच्या दैनंदिन व्यवहारात बोलीत बोलत असतो. परंतु सभेत बोलताना किंवा ग्रंथलेखन वा पत्रलेखन करतानाही भाषेचा आश्रय घेत असता.

**बोली : व्याख्या –**

1) 'बोलली जाते ती भाषा' अशीही भाषेची व्याख्या केली जात असली तरी बोली सुध्दा बोलली जाते, हे विसरुन चालणार नाही.
2) एकभाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एकभाषक समाजाच्या एखादया विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाण – घेवाणीसाठी दैनंदिन व्यवहारासाठी वापरल्या जाणा–या विशिष्ट भाषिक रुपास 'बोली' असे म्हणता येईल.
3) मराठी भाषेच्या बोली म्हणजे आपल्या भाषेचे जिवंत झरे. एका परीने ते आपल्याच भाषेचे संचित असून या संचिताद्वारे प्रारब्ध आकाराला येतो.

डॉ.ना.गो. कालेलकर म्हणतात, 'बोली हे दैनंदिन व्यवहाराचे साधन आहे. परिस्थितीला अनुरुप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एकप्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभविकता हेच तिचे वैशिष्टये होय'.

प्रशासन, राजकीय व्यवहार, शिक्षणाचे माध्यम, समाजातील लेखी व्यवहार यांसाठी सहसा बोलीचा वापर केला जात नाही. बोलीचा वापर करणारे गट लेखन व्यवहारासाठी प्रमाणभाषेची बोली म्हणून किंवा त्या प्रमाणभाषेच्या अधिपत्याखाली वावरणारी बोली म्हणूनच ओळखली जाते. याचा अर्थ बोलीला अस्तित्व असते, ते कोणत्या तरी प्रमाणभाषेच्या संदर्भात अर्थात ही बोली कोणत्या प्रमाणभाषेची आहे, याचा निर्देश करावा लागतो. उदा. 'खानदेशी' ही मराठीची बोली आहे, हे नमुद करावे लागते. कारण खानदेशीला अस्तित्व आहे, ते मराठी भाषेच्या संदर्भातच. याचे कारण म्हणजे खानदेशी बोली बोलणारे लोक इतर मराठी लोकांशी बोलतांना प्रमाण मराठीचा वापर करतात. मात्र सर्व खानदेशी माणसे आपापसांत दैनंदिन व्यवहार करताना न चुकता प्रमाण मराठी ऐवजी आपल्या खानदेशी या बोलीचाच म्हणजे मराठी भाषेचा एका विशिष्ट रुपाचाच वापर करीत असतात.

**प्रमाणभाषा :– व्याख्या**

1. बोलीच्या तुलनेने अधिक व्यापक क्षेत्रात सार्वत्रिक विनिमयासाठी जी बोली स्वीकारली जाते, तिला प्रमाणभाषा म्हणण्यात येते.

2. भौगोलिक किंवा सामाजिक कारणांमुळे निर्माण झालेल्या विविध भाषाभेदांना सामावून घेणारी त्या त्या समाजाची अशी एक एकसंध भाषा मानली जाते, तिला प्रमाणभाषा म्हणता येईल.

**स्थानिक भेद :–**

कोणतीही बोली पुन्हा तिच्या प्रदेशात किंवा तिच्या गटात सर्वत्र सारखी बोलली जातेच असे नाही. बोली तीच असते, परंतु एखादया ठिकाणी ती किंचित लक्षणीय बदल होऊन बोलली जाते. अशा फरक किंवा बदल घेऊन बोलल्या जाणा–या बोलीच्या रुपाला 'स्थानिक भेद' असे म्हणतात. उदा . साता–यास मराठीची बोलीच काही प्रमाणत फरक होऊन बोलली जाते. या फरकालाच स्थानिक भेद म्हणता येईल.

**भाषा आणि बोली यांचा परस्परसंबंध :–**

भाषा आणि बोली यांचा परस्परसंबंध पाहता, त्याबद्दलचे काही गैरसमजही जाणून घेणे आवश्यक आहे. एकेकाळी शुध्द आणि प्रमाणभूत भाषेचे अपभ्रष्ट रुप म्हणजे बोली असे समजले जात असे. संस्कारहीन, मागासलेल्या व उच्चारेंद्रिय सदोष असलेल्या लोकांनी भाषेला दिलेले विकृत व रोगट रुप म्हणजे बोली, असा सर्वत्र समज होता. आजही ही समजूत नाहीशी झाली, असे म्हणता येत नाही. म्हणूनच शिक्षणाच्याद्वारे आणि व्याकरणाद्वारे शुध्द कसे बोलावे? तेही शिकविण्याचा काही लोक प्रयत्न करतात.

साहित्यिक आणि उच्चवर्णीय लोकांची प्रमाणभाषा स्थानिक बोलीपेक्षा प्राचीन असते. स्थानिक लोकांच्या अज्ञानामुळे व निष्काळजीपणामुळे बोली निर्माण होतात, 18 व्या शतकातील युरोपियन ऐतिहासिक भाषाशास्त्राचा विकास झाल्यामुळे असे दाखविता येते, की प्रमाणभाषा कितीही प्राचीन असो, ती स्थानिक बोलीमुळेच विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीत विकसित झाालेली असते. युरोपातील फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश वगैरे भाषांची नावे देखील 12 व्या, 13 व्या शतकात नॉर्मन, पिकॉर्ड, लेओनीज, व्हेनिशियन अशी त्यांच्या निरनिराळया बोलींची निदर्शक होती. त्यानंतर फ्रान्स, इटली, स्पेन ही राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतीकदृष्टया एकसध राष्ट्रे म्हणून पुढे आल्यावर त्यांच्या भाषा ही त्या त्या देशांच्या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या म्हणजे मूळच्या बोलीचे प्रमाणभाषेत रुपांतर झाले. अशाप्रकारे बोली ही प्रमाणभाषेचे विकृत रुप नसून ती भाषेतील स्वाभाविक परिवर्तनाची द्योतक आहे. भाषा आणि बोलो यातील परस्परसंबंध पुढील मुद्यांच्या अनुषंगाने स्पष्ट करणे शक्य होईल.

1) बोलीतून प्रमाणभाषा आकार घेते आणि विशिष्ट सामाजिक व ऐतिहासिक परिस्थितीत विकसित होते. वास्तविक पाहता बोली भाषेचे अधिक प्राचीन रुप टिकविणा–या व गुणसंपन्न असतात.
2) यादवांची राजवट आणि ज्ञानदेवांसारखे प्रतिभावंत ग्रंथकार यांच्यामुळेच 12 व्या शतकात मराठी बोलीला ग्रांथिक भाषेचा दर्जा प्राप्त झाला. महानुभावांपासून मोरोपंतापर्यंतच्या सा–याच प्रतिभावंतांना संस्कृतापासून मराठीचे हे वेगळेपण जपावे लागले आहे.
3) बोली बोलणा–या लोकांची संस्कती, राजकीय महत्त्वाकांक्षा आणि बौध्दिक पातळी यावर भाषा आणि बोली यांचे परस्पर सबंध अवलंबून असतात. त्यानुसार बोलीचे भाषेत वा भाषेचे बोलीतही रुपांतर होऊ शकले.
4) बोली निर्माण झााल्या म्हणजे मध्यवर्ती भाषा कमकुवत होतात, त्यांचे सामर्थ्य उणावते, बोलींच्या निर्मितीमुळे मध्यवर्ती भाषांच्या विकासाला अडथळे निर्माण होतात, अशीही एक गैरसमजूत या संदर्भात दृढ आहे. बोली मूळ भाषेच्या शोषक नसून पोषक असतात, असा आपला अभिप्राय या संबंधात मॅक्सम्युलरने प्रकट केला आहे.
5) भाषा आणि बोली परस्परभिन्न पण परस्परपूरक असतात. जिवंतपणा, रसरशीपणा, जोरकसपणा आणि खेळकरपणा हे बोलीचे जन्मदत्त गुणवैभव आहे. तिच्यामुळे भाषेला एक प्रकारची संजीवनी प्राप्त होते. भाषेतील सुजनशीलता आणि चैतन्य अधूनमधून तिच्यात येऊन मिळणा–या बोलीमुळेच टिकते. बोलीचा परिणाम मुख्य भाषेच्या जडण–घडणीत दिसतो. बोलीतील अनेक वैशिष्टये प्रमाणभाषेत प्रत्यक्षही सामील

होतात. त्याचप्रमाणे प्रमाणभाषाही बोलींना संस्कारित करीत असते. ही दुहेरी क्रिया चालत असते. बोली प्रमाणित होऊन स्थिररुप होणे आणि प्रमाणभाषेत बोली मिसळून ती प्रवाही हाणे या दोन्ही क्रिया सारख्या चालू असतात.

मराठी भाषा आणि तिच्या बोली यांच्या संदर्भात प्र.भा. मांडे लिहितात, '' मराठीचे प्रारंभीचे लेखन लोकांच्या बोलीत झाल्यामुळे तिला वैभव प्राप्त झाले. बोलीला प्रौढत्व येऊन तिला प्रतिष्ठा लाभली. नंतर जसजसे या बोलित लेखन होऊ लागले, तसतसे तिचे स्वरुप साचेबंद होऊ लागले. परंतु मराठीला वेळोवेळी ग्रामीण समाजात प्रचलित असलेल्या बोलीपासून संजीवनी मिळाल्यामुळे ही भाषा अनेक अवस्थांतरातून जिवंत राहिली आहे.

**सारांश :–**

भाषा आणि बोली एकमेकांच्या साहाय्याने अस्तित्वात येणारे आविष्कार आहेत. समाजातील बहुविध संस्कृतीला जोडणारा भाषा हा एक अनुबंध आहे आणि म्हणून तोही बहुरुपी असतो. या बहुरुपांच्या समुहालाच आपण भाषा म्हणत असतो. भाषेला त्याहून वेगळे असे अस्तित्व नसते. अस्तित्व असते ते तिच्या विविध रुपांना त्यांनाच आपण बोली म्हणत असतो.

**संदर्भ ग्रंथ :–**

1. सामाजिक भाषाविज्ञान – प्रा.डॉ.प्रभाकर जोशी, डॉ चारुता गोखले
2. समाज भाषाविज्ञान – प्रमुख संकल्पना, रमेश वरखेडे.
3. समाज भाषाविज्ञान – डॉ. रमेश धोंगडे
4. सामाजिक भाषाविज्ञान – 'कक्षा आणि अभ्यास' – संपा. डॉ.जयश्री पाटणकर
5. साहित्यविचार – प्रा. भालचंद्र खांडेकर
6. वर्णनात्मक भाषाविज्ञान – डॉ. लीला गोविलकर